# जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
## जाहीर निविदा

या जाहीर निविदेद्वारे तमाम फॅब्रिकेटर्स/पुरवठादार यांना कळविण्यात येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव मुख्यालयातील असलेल्या न्यायदान कक्षाबाहेर बसविण्यात आलेल्या डिस्प्ले बोर्ड मॉनीटरचे सुरक्षा कवच (T.V.) तयार करुन बसवायचे आहे. तरी याकामी ज्या फॅब्रिकेटर्स/पुरवठादार यांना स्वारस्य असेल त्यांनी त्यांची दरपत्रके बंद पाकिटात मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांचे नावाने पाकिटावर ''डिस्प्ले बोर्ड मॉनीटरचे (T.V.) सुरक्षा कवच दरपत्रक'' असे नमुद करुन पाकीटे प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव यांचे कक्ष क. 101 मध्ये दिनांक 16/01/2026 पर्यत कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सादर करावीत अथवा समक्ष आणून द्यावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. एकूण प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक 17/01/2026 रोजी मा. जिल्हा न्यायाधीश–1, जळगांव यांचे समक्ष त्यांच्या निजी कक्षात उघडले जातील.

कार्यालयीन उपयोगाकरीता डिस्प्ले बोर्ड मॉनीटरचे (T.V.) सुरक्षा कवच खालील प्रमाणे उधारीवर खरेदी करावयाची आहेत.

| अ.नं. | खरेदी करावयाच्या वस्तु व तपशील | संख्या |
|---|---|---|
| 1 | डिस्प्ले बोर्ड मॉनीटरचे (T.V.) सुरक्षा कवच उंची 19", रुंदी 26" व खोली 6" | 24 |

## सर्वसाधारण अटी.

| | |
|---|---|
| 1. | दरपत्रक स्विकृत केल्यावर पुरवठा आदेश दिल्यानंतर सदरचे साहित्य त्वरीत पुरवावे. सदरील साहित्याचा दर्जा उत्कृष्ट आणि उच्च प्रतीचा असावा, दर्जा उत्कृष्ट आणि उच्च प्रतीचा नसल्यास स्विकाराला जाणार नाही. |
| 2 | ज्या पुरवठादाराचे दरपत्रक मंजुर केले जातील त्यांनी निविदेत नमुद केलेल्या प्रमाणे सदर साहित्य पुरवावे तसेच ते बसवुन देण्यात यावे. |
| 3 | दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारणेचा संपुर्ण अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो., जळगांव यांच्याकडेस राखून ठेवण्यांत आलेला आहे.दरपत्रक भरतांना दर अंकात व अक्षरी असे दोन्ही प्रकारे भरावेत. |
| 4 | सदरील साहित्य कार्यालयात पोहोचवून दिल्यावर उधारीचे देयक तीन प्रतीत सादर करावे. |
| 5 | दरपत्रक भरतांना सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र जीएसटी टॅक्स असल्यास त्याचा स्वतंत्र दर नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते. त्या अटीस आधीन राहून दरपत्रक द्यावे लागेल तसेच बीलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार टी.डी.एस. कपात करण्यांत येईल. |
| 6 | उपरोक्त साहित्य अनुदानाअभावी कमी जास्त प्रमाणात खरेदी करण्याचे अधिकार मा. |

| | |
|---|---|
| | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साो., जळगांव यांच्या कडेस राखून ठेवण्यात आलेले आहेत. उपरोक्त वस्तुं उधारीवर खरेदी करावयाचे आहेत. तसेच सदर बीलाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार देण्यांत येईल. |
| 7 | दरपत्रक उघडण्याच्या दिवशी व नमुद वेळी दरपत्रक पाठविणा—यांनी प्रत्यक्ष हजर रहावे अथवा प्रतिनिधी पाठवावा अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत दरपत्रक उघडणेत येतील. |
| 8 | दरपत्रकातील दर दिनांक 31/03/2026 अखेर कार्यरत राहतील. अगर त्यानंतरही त्याच दरात पुरवठा केला जाईल, त्या कालावधीचा खुलासा स्पष्ट नमुद करावा. |
| 9 | नमुद वस्तूंचा पुरवठा आदेश देवूनही मुदतीत पुरवठा न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साो., जळगांव यांनी राखून ठेवला आहे. |

VJKalkar

म.जा.क.रोखशाखा/992/2026
जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
दिनांकः 05/01/2026.

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव

प्रत माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता.

1. म.जिल्हाधिकारी,जळगांव.
2. म.तहसिलदार,जळगांव.
3. म.दिवाणी न्यायाधिश व.स्तर,जळगांव.
4. जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
5. मुख्य न्यायदंडाधिकारी,जळगांव.
6. जिल्हा न्यायालय, जळगांव संकेतस्थळावर